रविवार, दि. ३० मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




शनि अमावस्यानिमित्त शनिवार (दि २९) रोजी शनी मंदिर येथे दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती. (छायाचित्र - किरण खानापुरे)

परतूर तहसिल आग घटना

## जनतेने अफवांवर विश्वास ठेवू नये

**जालना । प्रतिनिधी -** परतूर तहसिल कार्यालय परिसरातील पंचायत समितीची जून्या इमारतीमधील हॉल १ तहसिल कार्यालय परतूर यांच्या ताब्यात होते. या हॉलमध्ये विनावापर व निर्लेखीत करण्याकरीता असलेल्या २२ लोखंडी पेट्या, ०३ टेबल व इतर रद्दी कागदपत्रे सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५रोजी रात्री अंदाजे ०९:१५ वाजेच्या सूमारास अचानक लागलेल्या आगीमूळे जळून नष्ट झालेले आहेत. या घटनेचा ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी, परतूर यांनी मंगळवार, दि २५ मार्च, २०२५ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळावर जाऊन पंचनामा आहे. घटनास्थळावर करण्यात आलेल्या पंचनाम्यामध्ये वर नमुद केलेल्या व्यतीरिक्त हॉल मध्ये कोणतेही साहित्य अथवा सूरू असलेल्या प्रकरणांच्या संचीका नष्ट झाल्या नसल्याची खात्री करण्यात आली आहे. ज्यावेळी सदर हॉलला आग लागली होती, त्या आगीवर तात्काळ नियंत्रण आणून आटोक्यात आणली गेली. तसेच आग लागलेली इमारत बंद असल्यामूळे व या इमारतीस विज पुरवठा नसल्यामुळे ही आग आकस्मात लागलेली नसून, अज्ञात व्यक्तीने आग लावली असल्याची शक्यता आहे. याबाबत पोलीस स्टेशन परतूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे या आगीत निर्लेखीत साहित्य नष्ट झाले असून, या व्यतिरिक्त कोणतेही साहित्य नष्ट झालेले नाही. समाजातील काही व्यक्ती हे विनाकारण या घटनेमध्ये उपयोगी साहित्य जाळून नष्ट झाल्याची अफवा पसरवीत आहे. जनतेने अशा निरर्थक आणि चूकीच्या अफवावर विश्वास ठेवू नये असे अवाहन तहसिलदार परतूर यांनी केले आहे.

युवा आदर्श

### पाडवा कावड ...

बरवा मुहूर्त पाडवा
स्वर्ण खरेदी गडबड
कांचन संचय करी
स्थिती जरी अवघड
स्त्रिया सहित पुरूष
सुवर्णालंकार आवड
प्रकार नवे असंख्य
चोखंदळ होई निवड
चाले पूर्वापार परंपरा
सुवर्ण खरेदी सांगड
वैचारिक मोल पटते
परिस्थिती ये धांगड
गुंतवणूक सोन्यामध्ये
घालून खर्चाला मुरड
कामाला येतो संचय
खरोखर जशी निकड
मुहूर्त नको टाळांया
कशी केवढी धडपड
केली पाहिजे खरेदी
रे भाव जरी वरचढ
मुहूर्ताने सुवर्ण खरेदी
बचत जमणार रगड
धर्मामागे शास्त्र काय
जाणीव दालन उघड
जग धावे म्हणून धाव
नको हव्यासी परवड
बोंबाबोंब खूप केली
नुकती झाली धुळवड
बौध्दिक गुढी उभारा
मर्यादित असो आवड
नवसंवत्सराचे स्वागत
पेलता आव्हान कावड

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## कुंडलिका-सीना अतिक्रमण मुक्तीसाठी जिल्हा प्रशासनाच्या गतिमान हालचाली

### जिल्हाधिकाऱ्यांनी २ एप्रिलला लावली बैठक; आंदोलन मागे घेण्याचे मनपाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील कुंडलिका-सीना नदीवरील अतिक्रमण हटवण्यासाठी सामाजिक संघटनांच्या दि. १ एप्रिलपासून नियोजित बेमुदत साखळी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने हालचाली गतिमान केल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी २ एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालय बैठक बोलावली असून, महापालिकेनेही या संदर्भात संघटनांशी पत्रव्यवहार करून या मुद्द्यावर बैठक लावली असल्याने नियोजित आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती केली आहे.

वेळोवेळी आश्वासन मिळूनही जिल्हा प्रशासन प्रत्यक्ष कार्यवाही टाळत असल्याने सामाजिक संघटनांनी आक्रमक पवित्रा घेत एक एप्रिल पासून बेमुदत साखळी आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात कुंडलिका-सीना नदी पुनर्जीवन अभियान अंतर्गत पाणलोट क्षेत्र आणि जालना महापालिका हद्दीतील झालेल्या अतिक्रमणांबाबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दि. २ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीला उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बैठकीबाबत सामाजिक संघटनानाही कळविण्यात आले



आहे

सामाजिक संघटनांनी अतिक्रमण हटवण्याच्या मागणीसाठी, नदीची पुररेषा सीमा निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. 'चला नदी वाचवू' या उपक्रमांतर्गत शेकडो नागरिक आणि संघटनांनी प्रशासनाकडे त्वरित कारवाईची मागणी केली. समस्त महाजन, मुंबई, कुंडलिका - सीना रिज्यूवनेशन फाउंडेशन, आनंद नगर सेवाभावी संस्था, हंड्रेड रुपी सोशल क्लब, महाराष्ट्र योग शिक्षक संघ, बागेश्वर धाम सेवा समिती तसेच विविध सामाजिक संस्थांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

जिल्हा प्रशासनाने वरील मुद्द्यावर बैठक बोलावल्याने सामाजिक संघटनांनी एक एप्रिल पासूनचे बेमुदत साखळी आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी संघटनांना केले आहे. महापालिकेच्या पत्रानुसार, जिल्हाधिकाऱ्यांनी १ एप्रिल रोजीच्या नियोजित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर २ एप्रिलला बैठक लावल्याने प्रशासनाची भूमिका स्पष्ट झाली आहे. त्यामुळे अतिक्रमण हटवण्याच्या प्रक्रियेस पुष्टी दिलेली आहे.

जालना शहरातील नदी किनाऱ्यावरील अतिक्रमणांमुळे पर्यावरणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर ठोस उपाययोजना न केल्यास मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक संघटनांनी दिला आहे. प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी नागरिकांचीही मागणी आहे.

'माझा जिल्हा आणि मी' उपक्रमाचा समारोप

## पहिलीच्या विद्यार्थ्यांना मिळाली जिल्ह्याच्या १४० प्रश्नोत्तरांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांना स्वतःच्या जिल्ह्याविषयीची प्रशासकीय, राजकीय, भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक माहिती होण्यासाठी मंठा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथे संपूर्ण मार्च महिन्यात 'माझा जिल्हा आणि मी' हा इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांनी उपक्रम राबविला.

विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचून माहिती संकलनाची आवड निर्माण झाली असून पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी फलदायी ठरणार असल्याची प्रतिक्रिया पालक मारोती जोशी, जीवन वायाळ, गुणाजी नजान, नामदेव बोराडे, सुरेशराव काळे, गजानन चव्हाळ आदींनी व्यक्त केली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या १५ ऑनलाइन चाचण्या घेण्यात आल्या तर जालन्याबरोबरच मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचीही थोडक्यात माहिती देण्यात आली.




शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस. मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, अनुजा पाटील, गीता बरसाले, देविदास मामीलवार यांच्या उपस्थितीत समारोप करण्यात आला. उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, गट समन्वयक के.जी. राठोड, केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पालक योगेश बोराडे, सुदाम डोळझाके, एकनाथ घोंगडे, दत्ता गोरे, परमेश्वर काळे, राजेंद्र घोंगडे, बाळासाहेब परभने, रामा घोंगडे यांनी सहकार्य केल्याचे गंगाधर वानोळे यांनी सांगितले.

## परतूर सारख्या ठिकाणी रुग्णांना जीवदान देणारे डायलिसिस सेंटर

**परतूर । प्रतिनिधी -** लॉयन सौ सविता व लॉयन प्रा भगवानराव ठाकर परतुर यांच्यातर्फे लॉयन्स डायलिसिस सेंटर करिता १ लक्ष ११ हजार रुपये डोनेशन जाहिर . दृष्टी लॉयन्स नेत्रालय अंतर्गत चालू करत असलेल्या डायलिसिस सेंटर करिता १ लक्ष ११ हजार रुपये डोनेशन आज जाहीर करण्यात आले आहे . लॉयन राहुल सातोनकर यांच्या निवासस्थानी झालेल्या लायन्स क्लबच्या मासिक बैठकीमध्ये प्राध्यापक लॉयन प्रा ठाकर यांनी डायलिसिस सेंटर चालू होत असलेल्या प्रकल्पासाठी १ लक्ष ११ हजार रुपये डोनेशन जाहिर करून डायलिसिस सेंटरला गतिमान करण्याचे काम केले आहे . परतुर सारख्या ठिकाणी अनेक रुग्णांना जीवदान देणारे डायलिसिस सेंटर लोकसहभागातून उभे राहण्याचा मानस परतुर व जालना लायन्स परिवारातर्फे घेण्यात आलेला आहे . दृष्टी लॉयन्स नेत्रालय सारखाच हा पण एक प्रकल्प अल्प दरामध्ये किडनीच्या आजाराच्या रुग्णांकरिता डायलेसिस सेंटर सुरूहोणार आहे . ग्रामीण भागातील रुग्ण हे जिल्हा ठिकाणी जाऊन आपला इलाज करत आहेत .दूर वर असलेले जिल्ह्याचे ठिकाण खर्चाचे व प्रवासाच्या दृष्टीने



त्रासदायक होत असल्यामुळे तालुका स्तरावर लॉयनच्या माध्यमातून ग्रामीण भागाकरिता हा प्रोजेक्ट जीवदान ठरेल. दृष्टी लॉयन्स नेत्रालयाचे अध्यक्ष, मनोहर खालापूरे यांनी दैनिक युवा आदर्शच्या परतुर प्रतिनिधीशी बोलतांना माहिती दिली.

## संपादकीय

### भारताने केलेले उपकार बांगलादेश विसरला

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली आहे. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचेच राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. भारताने केलेले उपकार बांगलादेश आता विसरला आहे म्हणूनच भारताच्या पंतप्रधानांना त्याची पुन्हा आठवण करून द्यावी लागली.२६ मार्च १९७१ रोजी बांगलादेशची निर्मिती झाली. या घटनेला यावर्षी ५५ वर्ष पूर्ण झाली. बांगलादेशात त्यांचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी ही तो तसा साजरा करण्यात आला. दरवर्षी बांगलादेश स्थापना दिनी बांगलादेशचे पंतप्रधान देशवासीयांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना बांगलादेश निर्मितीत भारताने केलेल्या मदतीचे स्मरण करून भारताचे आभार मानतात मात्र यावेळी प्रथमच बांगलादेशने भारताचे आभार मानले नाही इतकेच नाही तर बांगलादेश निर्मितीत भारताने दिलेल्या योगदानाची साधी दखलही घेतली नाही. हे पहिल्यांदाच घडले आहे म्हणूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश सरकारचे हंगामी पंतप्रधान डॉ. मोहंमद युनूस यांना शुभेच्छा पत्र पाठवून स्मरण करून दिले की १९७१ च्या मुक्ती संग्रामामुळे भारत आणि बांगलादेश दरम्यान नवीन संबंधांना सुरुवात झाली आहे हा दिवस दोन्ही देशांच्या भागीदारी आणि त्याग यांची आठवण करून देतो. आम्ही दोन्ही देशांमधील हे संबंध आणखी दृढ करण्यासाठी वचनबध्द आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पत्रातून बांगलादेशला शालजोडीतून मारतानाच भारताने बांगलादेश निर्मितीत केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे अर्थात या पत्रातून बोध घेऊन तरी बांगलादेशने आपल्या वर्तणुकीत बदल करायला हवा. भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित होणे हे बांगलादेशच्याच हिताचे आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशच्या नादी लागून भारताशी वैर पत्करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे हे बांगलादेश ने लवकरात लवकर समजून घ्यायला हवे कारण पाकिस्तान आणि चीन हे कधीही कोणाचे मित्र होऊ शकत नाही. जिथे फायदा तिथेच मैत्री असे या दोन्ही देशांचे धोरण आहे. आशिया खंडातील भारतचे वर्चस्व कमी करण्यासाठी हे दोन देश बांगलादेशचा वापर करून घेत आहेत. उद्या यांची गरज संपली की हे देश बांगलादेशला वाऱ्यावर सोडून देतील तेंव्हा बांगलादेशची अवस्था ना घर का ना घाट का अशी होईल. त्यामुळे बांगलादेशने आताच सावध होऊन भारताशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थपित करायला हवे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# गुढीपाडवा अर्थात हिंदूंच्या नववर्षदिनाचे महत्त्व !

हिंदु धर्मात गुढीपाडव्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा हा हिंदूंचा नववर्षारंभ. याच दिवशी सृष्टीची निर्मिती झाली म्हणून हा केवळ हिंदूंचाच नव्हे तर अखिल सृष्टीचा नववर्षारंभ आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभ करण्यास अर्थात गुढीपाडवा साजरा करण्यास नैसर्गिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कारणे आहेत. सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात गुढीपाडव्याचे महत्त्व जाणून घेऊया तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या आपत्काळात गुढीपाडवा कसा साजरा करायचा हेही समजून घेऊया.

**गुढीपाडवा म्हणजेच वर्ष प्रतिपदा !**

तिथी : युगादी तिथी, चैत्र शुद्ध प्रतिपदा

वर्षारंभ : चैत्र शुद्ध प्रतिपदाच का ? : याचा प्रथम उद्गाता 'वेद' आहे. वेद हे अतीप्राचीन वाङ्मय आहे, याबद्दल दुमत नाही. 'द्वादशमासैः संवत्सरः ।' असे वेदात म्हटले आहे. वेदांनी सांगितले म्हणून ते जगाने मान्य केले. वर्षारंभाचा प्रारंभ दिवस 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' हा आहे. आज सर्वजण साजरा करत असलेल्या १ जानेवारीला वर्षारंभ का, याला शास्त्रीय आधार नाही. याउलट चैत्र शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभ करण्यास अर्थात गुढीपाडवा साजरा करण्यास नैसर्गिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कारणे आहेत.

**गुढीपाडवा : नैसर्गिक महत्त्व -**

वसंत ऋतूच्या प्रारंभाचा दिवस : ज्योतिषशास्त्रानुसार पाडव्याच्या आसपासच सूर्य वसंतसंपातावर येतो (संपात बिंदू म्हणजे क्रांतीवृत्त आणि विषुववृत्त ही दोन वर्तुळे ज्या बिंदूत परस्परांस छेदतात तो बिंदू होय.) आणि वसंत ऋतू चालू होतो. सर्व ऋतूंत 'कुसुमाकरी वसंत ऋतू ही माझी विभूती आहे', असे भगवंतांनी श्रीमद्भगवद्गीतेत (१०:३५) म्हटले आहे. या वेळी हवामान समशीतोष्ण आणि उत्साहवर्धक असते. शिशिर ऋतूत झाडांची पाने गळून गेलेली असतात, तर पाडव्याच्या सुमारास झाडांना नवी पालवी येत असते. वृक्षवल्ली टवटवीत दिसतात.

**गुढीपाडवा : ऐतिहासिक महत्त्व -**

रामाने वालीचा वध केल्याचा दिवस : रामाने वालीचा वध या दिवशी केला.

ज्या दिवशी राम रावणवधानंतर आयोध्येला परत आला, त्या दिवशी रामाच्या विजयाचे आणि आनंदाचे प्रतीक म्हणून घरोघरी गुढी (ब्रह्मध्वज) उभारली होती. विजयाचे प्रतीक हे उंच असते, म्हणून गुढी उंच उभी केली जाते.

शालिवाहन शक चालू झाल्याचा दिवस ! : शकांनी हुणांचा पराभव करून विजय



मिळविला तोही हाच दिवस अर्थात् गुढीपाडवा. या दिवसापासूनच शालिवाहन शक सुरू झाले; कारण या दिवशी शालिवाहनाने शत्रूवर विजय मिळविला.

ही गुढीपाडवा हा वर्षारंभ साजरा करण्यामागील ऐतिहासिक कारणे आहेत.

**गुढीपाडवा : आध्यात्मिक महत्त्व -**

सृष्टीची निर्मिती म्हणजेच सत्ययुगाच्या प्रारंभाचा दिवस : ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली, म्हणजे सत्ययुगाला सुरुवात झाली, तो हा दिवस असल्याने या दिवशी वर्षारंभ केला जातो.

१ जानेवारी नव्हे, तर गुढीपाडवा हाच पृथ्वीचा खरा वर्षारंभदिन

गुढीपाडवा हा पृथ्वीचा खरा वर्षारंभदिन : 'गुढीपाडव्याला सुरू होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या उत्पत्तीकाळाशी निगडित असल्याने सृष्टी नवचेतनेने भारित झालेली असते. याउलट ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता सुरू होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या लयकाळाशी निगडित असते. गुढीपाडवा या दिवशी सुरू होणार्‍या नववर्षाची तुलना सूर्योदयाला उगवणार्‍या तेजोमयी दिवसाशी करता येईल, तर ३१ डिसेंबरला रात्री १२ वाजता सुरू होणार्‍या नववर्षाची तुलना सूर्यास्तानंतर सुरू होणार्‍या तमोगुणी रात्रीशी करता येईल. निसर्गनियमाला अनुसरून केलेल्या गोष्टी मानवाला पूरक असतात, तर विरुद्ध केलेल्या गोष्टी मानवाला हानीकारक असतात. यास्तव पाश्चात्त्य संस्कृतीनुसार १ जानेवारी हा नव्हे, तर गुढीपाडवा हाच नववर्षारंभ साजरा करण्यात आपले खरे हित आहे.

गुढीपाडवा : साडेतीन मुहूर्तांपैकी एक : गुढीपाडवा, अक्षय्य तृतीया आणि दसरा म्हणजे प्रत्येकी एक अन् कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजे अर्धा, असे साडेतीन मुहूर्त आहेत. या साडेतीन मुहूर्तांचे वैशिष्ट्य असे की, इतर दिवशी कोणत्याही शुभकार्यासाठी मुहूर्त पहावा लागतो; या दिवशी मात्र मुहूर्त पहावा लागत नाही. या दिवसांतील कोणतीही घटिका शुभमुहूर्तच असते.

प्रत्येक पाऊल समृद्धीकरता पुढे टाकण्याची शिकवण देणारी चैत्र शुक्ल प्रतिपदा ! : उत्तरायणातील वसंतऋतूतील चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदेला शुभसंकल्पाची गुढी उभारायची असते. गुढीपाडवा हे संकल्पशक्तीचे गुढत्व दर्शवते. 'आमचे प्रत्येक पाऊल आमच्या समृद्धीकरिता आता पुढेच पडत राहील', असे प्रतिप्रदा सांगते; म्हणून या दिवशी शुभसंकल्प केल्यास, तो संकल्प आपल्या जीवनाला फलदायी होतो. याकरिताच सत्यसंकल्परूपी गुढीची मुहूर्तमेढ रोवायची असते. - परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज

**गुढीपाडव्याच्या शुभेच्छा !**

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।।

अर्थ : पृथ्वीवरील सर्व जीव सुखी आणि निरामय (रोगमुक्त) होवोत. सर्वांचे कल्याण होवो. सर्वांची एकमेकांकडे पहाण्याची दृष्टी शुभ आणि कल्याणमय असो आणि कोणाच्याही वाटेला दुःख न येवो.

तेव्हा वर वर्णन केल्याप्रमाणे या गुढीपाडव्याच्या दिवशी सत्य संकल्पाची, तो प्रत्यक्षात यावी; म्हणून कृतीशील भक्तीसाठी मूर्त स्वरूप अशा गुढीची मुहूर्तमेढ आनंदाने करून म्हणूया,
' शांतिः शांतिः शांतिः ।'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था. संपर्क- ९२८४०२७१८०**

# गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाच्या धार्मिक कृती

कुठलाही सण आला की त्या त्या सणाच्या वैशिष्ट्याप्रमाणे आणि आपल्या पद्धतीप्रमाणे आपण काहीतरी करीतच असतो. मात्र धर्मात सांगितलेल्या अशा पारंपरिक कृतींमागील अध्यात्मशास्त्र लक्षात घेतल्यास त्याचे महत्त्व आपल्याला पटते. गुढीपाडव्याच्या दिवशी केल्या जाणार्‍या धार्मिक कृतींची माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात जाणून घेऊया तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या आपत्काळात गुढीपाडवा कसा साजरा करायचा हेही समजून घेऊया.

अभ्यंगस्नान (मांगलिक स्नान) : गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून प्रथम अभ्यंगस्नान करण्यास सांगितले आहे. अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करतात.

तोरण लावणे : स्नानानंतर आम्रपल्लवांची तोरणे सिद्ध करून प्रत्येक द्वाराशी लाल फुलांसहित बांधावी; कारण लाल रंग शुभदर्शक आहे.

पूजा : प्रथम नित्यकर्म देवपूजा करतात. 'वर्षप्रतिपदेला महाशांती करायची असते. शांतीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करतात; कारण या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली. पूजेत त्याला दवणा वाहतात. नंतर होमहवन आणि ब्राह्मणसंतर्पण करतात. मग अनंत रूपांनी अवतीर्ण होणार्‍या विष्णूची पूजा करतात. 'नमस्ते बहुरूपाय विष्णवे नमः ।', हा मंत्र म्हणून त्याला नमस्कार करतात. नंतर ब्राह्मणाला दक्षिणा देतात. शक्य झाले तर इतिहास, पुराणे इत्यादी ग्रंथ ब्राह्मणाला दान देतात. ही शांती केल्याने सर्व पापांचा नाश होतो, उत्पात घडत नाहीत, आयुष्य वाढते आणि धनधान्याची समद्धी होते, असे सांगितले आहे.' संवत्सर पूजा केल्याने सर्व पापांचा नाश होतो, आयुष्यवृद्धी होते, सौभाग्याची वाढ होते आणि शांती लाभते. या दिवशी जो वार असेल, त्या वाराच्या देवतेचीही पूजा करतात.

गुढी उभारणे : या दिवशी विजयाचे प्रतीक म्हणून सूर्योदयाच्या वेळी शास्त्रशुद्ध गुढी उभारली जाते. गुढी सूर्योदयानंतर लगेचच मुख्य द्वाराच्या बाहेर; परंतु उंबरठ्यालगत (घरातून पाहिल्यास) उजव्या अंगाला (बाजूला) भूमीवर पाट ठेवून त्यावर उभी करावी. गुढी उभी करतांना तिची स्वस्तिकावर स्थापना करून पुढे थोडीशी कललेल्या स्थितीत उंचावर उभी करावी. सूर्यास्ताच्या वेळी गुळाचा नैवेद्य दाखवून गुढी उतरवावी.

दान : याचकांना अनेक प्रकारची दाने द्यावीत, उदा. पाणपोईद्वारा उदकदान. याने पितर संतुष्ट होतात. 'धर्मदान' हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे शास्त्र सांगते. सध्याच्या काळात धर्मशिक्षण देणे, ही काळाची आवश्यकता आहे.




पंचांगश्रवण : ज्योतिषाचे पूजन करून त्याच्याकडून किंवा 'उपाध्याकडून नूतन वर्षाचे पंचांग अर्थात् वर्षफल श्रवण करतात. या पंचांगश्रवणाचे फल सांगितले आहे, ते असे -




तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं वारादायुष्यवर्धनम् । नक्षत्राद्धरते पापं योगाद्रोगनिवारणम् ।।
करणाच्चिन्तितं कार्यं पञ्चाङ्गफलमुत्तमम् । एतेषां श्रवणान्नित्यं गङ्गास्नानफलं लभेत् ।।

अर्थ : तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते, वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते, नक्षत्रश्रवणाने पापनाश होतो, योगश्रवणाने रोग जातो, करण श्रवणाने चिंतिले कार्य साधते. असे हे पंचांगश्रवणाचे उत्तम फल आहे. त्याच्या नित्य श्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.'

कडुनिंबाचा प्रसाद : पंचाग श्रवणानंतर कडुनिंबाचा प्रसाद वाटायचा असतो. हा प्रसाद कडुनिंबाची पाने, जिरे, हिंग, भिजलेली चण्याची डाळ आणि मध यांपासून सिद्ध करतात.

भूमी (जमीन) नांगरणे : या दिवशी भूमीत नांगर धरावा. नांगरण्याच्या क्रियेने खालची माती वर येते. मातीच्या सूक्ष्म कणांवर प्रजापति लहरींचा संस्कार होऊन बीज अंकुरण्याची भूमीची क्षमता अनेक पटींनी वाढते. शेतीची अवजार अन् बैल यांवर प्रजापति लहरी उत्पन्न करणार्‍या मंत्रासह अक्षता टाकाव्या. शेतात काम करणार्‍या माणसांना नवीन कपडे द्यावे. या दिवशी शेतात काम करणारी माणसे अन् बैल यांच्या भोजनात पिकलेला भोपळा, मुगाची डाळ, तांदुळ, पुरण इत्यादी पदार्थ असावेत.

सुखदायक कृत्ये : नाना प्रकारची मंगल गीते, वाद्ये आणि पुण्य पुरुषांच्या कथा ऐकत हा दिवस आनंदाने घालवावा. हल्लीच्या काळी सण म्हणजे मौजमजा करण्याचा दिवस अशी काहीशी संकल्पना झाली आहे; मात्र हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे सण म्हणजे 'अधिकाधिक चैतन्य मिळवण्याचा दिवस' असतो. त्यामुळे सणाच्या दिवशी सात्त्विक भोजन, सात्त्विक पोषाख, तसेच अन्य धार्मिक कृत्ये इत्यादी करण्यासमवेतच सात्त्विक सुखदायी कृत्ये करण्यास शास्त्राने सांगितले आहे. सण, धार्मिक विधीच्या दिवशी अन् गुढीपाडव्यासारख्या शुभदिनी नवीन किंवा कौशेय (रेशमी) वस्त्रे आणि अलंकार धारण केल्याने देवतांचे आशीर्वाद लाभतात.वस्त्रांत आकृष्ट झालेल्या देवतांच्या तत्त्व लहरी वस्त्रांमध्ये दीर्घकाळ टिकून रहातात आणि ही वस्त्रे वर्षभर परिधान करणार्‍याला देवतांच्या तत्त्वलहरींचा वर्षभर लाभ होतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाची प्रार्थना : 'हे ईश्वरा, आज तुझ्याकडून येणारे शुभाशीर्वाद आणि ब्रह्मांडातून येणार्‍या सात्त्विक लहरी मला जास्तीतजास्त ग्रहण करता येऊ देत. या लहरी ग्रहण करण्याची माझी कुवत नाही. मी तुला संपूर्ण शरण आलो आहे. तूच मला या सात्त्विक लहरी ग्रहण करायला शिकव', हीच तुझ्याचरणी प्रार्थना !

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

## ||..गुढीपाडवा..||

नव्या क्षितिजाची नवी पहाट
नव्या आशेची नवी वाट
गुढी उभारू संस्कृतीची
गुढी उभारू समृद्धीची
गुढी उभारू स्वप्नपूर्तीची
गुढी उभारू देशभक्तीची
वाईट सगळे विसरायचे
पुन्हा नव्याने जगायचे
गुढीच्या सोबतीने साजरा
करूया गुढीपाडवा
गुढी साक्षीने म माणसातली
माणुसकी वाढवा

स्नेहा संतोष खोडके


# दीपसन्न रेमेडी




- वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
- वेब पोर्टल, युट्युब चॅनल
- वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
- नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
- वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886







रमजान ईद निमित्ताने शीरखुर्मा साठी लागणारे साहित्य खरीदी साठी सुखा मेवा बाजारात उपलब्ध (छाया । जावेद तांबोली)

# लोकशाही दिनाचे ७ एप्रिल रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. त्यानूसार जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोम वारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक म हिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार म ांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# जालना मारवाड़ी सम्मेलन तर्फे गणगौर उत्सव साजरा



**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय जालना जिला मारवाड़ी महिला सम्मेलन तर्फे जिलाध्यक्षा सावित्रीदेवी मल्लावत यांनी गणगौर उत्सव साजरा केला. मारवाड़ी समाजातील जुनी रितीरिवाज व संस्कृतीचा वारसा पुढच्या पिढीला समजावा या उद्देशाने गेल्या पाच वर्षांपासून हा गणगौर उत्सव सावित्री मल्लावत दर वर्षी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करतात. यावेळी ईसरजी गणगौर ची मिरवणूक कार्यक्रम झाल्या नंतर गणगौर गीत, सोलह श्रृंगार, गणगौर डान्स व घूमर स्पर्धा, वन मिनट गेम, हौजी गेम आणि सामूहिक नृत्य या स्पर्धा मध्ये सुमारे ६० महिलांनी सहभाग घेतला. स्पर्धेत ईशा शर्मा, निर्मला गुडवाले, शोभा देवीदान, स्नेहा जोशी, शोभा खंडेलवाल, स्वीटी अग्रवाल, नीता खंडेलवाल, लीला निम ोदीया, अरुणा खंडेलवाल, इंदु भारुका, विद्या गोयल, श्रद्धा लोहिया, तारा शर्मा ह्या विजेत्या ठरल्या. विजेत्यांचा बक्षिसे देत गौरव केला गेला. सामाजिक संस्कृतीचा वारसा सांगणारे गणगौर सारखे उत्सव नेहेमीच साजरे व्हावेत असे म नोगत उपस्थितांनी मांडले. जिल्हाध्यक्ष सावित्री मल्लावत यांनी आभार व्यक्त केले.

## एसएन ग्रुप फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम - सपोनी खामगळ

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** एस.एन.ग्रुप फाउंडेशन मार्फत जालना जिल्हा मधील टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे पक्षांसाठी पाणी पिण्या साठी मातीचे पॉट लावण्यात आले. उपस्थित सर्व पोलिस अधिकारी तसेच एस.एन.ग्रुप फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष दुर्गेश बनकर, उपाध्यक्ष विशाल नवले तसेच सामाजिक कार्यकर्ते पवन नवले, आकाश नवले, सचिन म्हस्के, भागवत लोखंडे, दुर्गादास देशमुख, गणेश नवले, समाधान नवले आदींची उपस्थिती होती.

या उपक्रमाबद्दल टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी एस एन ग्रुप फाउंडेशन चा उपक्रम स्तुत्य असून सामाजिक बांधिलकी म्हणून आणि वन्यजीवांना जीवदान देण्यासाठी केलेला उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. आजकाल अशा सामाजिक उपक्रमांची आवश्यकता असून असे सामाजिक उपक्रमावर आधारित कार्यक्रम होणे गरजेचे आहे. मुक्या प्राण्यांनाही ही जीव असतो. अशा न बोलणाऱ्या सजीवांना सामाजिक बांधिलकीने त्यांच्याशी वागलो तर सामाजिक उपक्रमाची दिशा योग्य ठरते. हा एक सामाजिक उपक्रम चालवणारा ग्रुप असून अशा उपक्रमाची त्यांना आवड आहे हे ऐकून आम्हासारख्या लोकांना त्यांचे कौतुक वाटते. सचिन तिडके, सागर शिवरकर, भुतेकर गजेंद्र, ठाकरे पोलीस, प्रदीप धोंडगे, पंडित गवळी, आदींची टेंभुर्णी उपस्थिती होती.

सामाजिक कार्यकर्ते तथा राजुरेश्वर टी हाऊसचे मालक सचिन म्हस्के त्यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की एसएन ग्रुपच्या माध्यमातून आम्ही अनेक सामाजिक उपक्रम राबवण्याचा प्रयत्न करणारा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# जॉयची शालेय विद्यार्थ्यांना किराणा किट, संगणक आणि शाळा डेव्हलपमेंटसाठी मदत



**मुंबई -** जॉय ऑफ गिविंग ग्रुप मुंबई च्या वतीने दिनांक २९ मार्च २०२५ रोजी उल्हासनगर पूर्व ठाकूर जागृती शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीतील २०० विद्यार्थ्यांना किराणा किट, संगणक आणि शाळा डागडुजी साठी दहा हजार रुपये देऊन सहकार्य करण्यात आले.उल्हासनगर गायकवाड नगर नंबर ५ येथील वस्तीत ही शाळा असून सेवानिवृत्त शिंदे दाम्पत्य आणि त्यांचा मुलगा साहिल शिंदे अत्यंत प्रतिकूल बिकट अवस्थेत ही शाळा चालवित आहेत.या शाळेत गरीब रोजंदारीवर काम करणाऱ्या लोकांची मुले शिकत आहेत. यावेळी शिक्षक नेते जनार्दन जंगले सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होतें. जॉय चे काम चांगले असून गोर गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि किराणा सामान वितरीत करण्याचे काम अनेक वर्षांपासून संस्था करीत असून आतापर्यंत हजारो विद्यार्थी व वृद्धना मदत पोहोचली आहे.सामान वितरीत करण्यासाठी चंद्रशेखर सावंत, भूषण मुळे, किरण मुणगेकर, अविनाश करगुटकर, विजय फणसेकर, सुनील चव्हाण, सुनील वडतकर, जनजागृती संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, गणेश हिरवे आदी कार्यकर्ते वेळात वेळ काढून उपस्थित होते.जॉय चे किरण मुणगेकर कुटुंबियांनी शाळेला संगणक भेट दिलं.मोठ्या प्रमाणावर मदत मिळाल्याने जॉय संस्थेचे आभार शाळेचे मुख्याध्यापक राम ाने यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावंत मॅडम यांनी केले.

# टेंभुर्णी सोसायटी च्या व्हॉईस चेअरमनपदी मारोती पंडीत

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था,(अ) च्या व्हाईस चेअरम नपदी मारुती पंडित यांची शुक्रवारी ता. २८ बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान व्हाईस चेअरमन अंकुश देशमुख यांनी पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त असलेल्या पदावर श्री पंडीत यांची निवड करण्यात आली.अंकुश देशमुख यांनी श्री पंडीत यांचे नाव सुचवले तर संचालक ठकसेन उखर्डे यांनी त्यास अनुमोदन दिले. चेअरमन गणेश धनवई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी बाबुखा पठाण,अमोल देशमुख,अर्जुन देशमुख, विष्णू जोशी, गणेश उखर्डे,रखमनबाई भागवत,नारायण उखर्डे,शोभाबाई गावंडे, विजय मघाडे यांची उपस्थिती होती. निर्वाचन अधिकारी म्हणून ए.के.म्हस्के यांनी काम पाहिले त्यांना श्री वाकळे यांनी सहकार्य केले.



## ज्युनियर वकिलांना स्टायफंड संदर्भात आ. खोतकरांनी लक्ष घालावे

**जालना । प्रतिनिधी -** अँड. महेश धन्नावत यांनी ज्युनियर विधीज्ञांना शासनाच्या १०० पेक्षा जास्त विभाग जेथे कायदातज्ञांची गरज आहे, शासनातर्फे सुरु असलेले लोकअभिरक्षक विभाग तथा जिल्हा सरकारी अभियोक्ता यांच्याकडे हाताखाली नविन विविज्ञांना संधी देऊन शासन स्तरावर त्यांना स्टायफंड द्यावा, ही मागणी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्याकडे आमदार अर्जुन खोतकर यांच्या मार्फत केली होती. आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत मांडणी केल्याने महाराष्ट्र अ‍ॅण्ड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. सिकंदर अली, जालना जिल्हा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. सतीष तवरावाला, कार्याध्यक्ष अ‍ॅड. महेश धन्नावत व विधीज्ञांनी आमदार खोतकरांचे आभार मानले. आता आमदार खोतकर हे अंदाज समितीचे अध्यक्ष असल्याने त्यांनी व्यक्तीशः याकडे लक्ष देऊन प्रत्यक्षात अंमलात आणावे, अशी अपेक्षा सुद्धा व्यक्त केली.

# तुळजाभवानी मातेच्या प्रवेशद्वार जमिनोध्वस्त करणाऱ्या वर कठोर कारवाई करा

## तेली समाज बांधवांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** अहिल्यादेवी जिल्ह्यातील बोरानगर येथे तुळजाभवानी मातेचे मोठे मंदिर आहे. तुळजाभवानी मातेने बाल्यावस्थेत भगत परीवाराच्या घरी खूप दिवस काढलेत अशी मोठी अख्यायिका आहे.भगत परीवाराने स्वतःच राहतं घर मंदिर म्हणून दान केलेलं आहे.तर घरचया आजूबाजूला असलेली शेती आणि परीसर भाविकांच्या सेवेसाठी दान करण्यात आलेला आहे.या ठिकाणी एक प्रवेशद्वार देखील उभारण्यात आलं होतं.शिवाय कार्यालय देखील होतं.मात्र स्थानिक प्रशासनाने कोणतीही नोटीस न काढता कार्यालय, प्रवेशद्वार भल्या पहाटे जमिनोध्वस्त केलं आहे.विशेष म्हणजे विरोध होऊ नये म्हणून भल्या पहाटे ०६: ०० वाजता ही कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर आमदार शिवाजी कर्डिले यांची मंदिराच्या जागेवर नजर असून मिळकत मिळवण्यासाठी ते भगत कुटुंबियांवर पदाचा, प्रशासनाचा गैरवापर करून दादागिरी करून धमक्या देत आहेत.

यावेळी जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की आई जगदंबा तुळजाभवानीने लहान मुलीच्या रूपात १२ वर्ष बुऱ्हाणनगर याठिकाणी आमचे पूर्वज संत जानकोजी भगत (तेली) यांच्या घरी वास्तव्य केलेले आहे. संत जनकोजी तेली यांना तुळजाभवानीने साक्षात्कार देऊन वरदान दिले तेव्हापासून सुमारे ११०० वर्षापासून तेली समाजाच्या भगत घराण्याकडे असलेली तुळजाभवानी पालखी परंपरा अखंडपणे चालू आहे.

भगत घराण्यातून श्री क्षेत्र तुळजापूर, धाराशिव येथे शारदीय नवरात्रीमध्ये प्रत्येक वर्षी गेल्या ११०० वर्षापासून अधिक काळापासून पालखी जाते आणि श्री तुळजाभवानीची देवीची मूळ मूर्ती पालखी मधून बसवून सीमोलंघन केले जाते आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विजयादशमी/ दसरा सण म ोठ्या उत्सवात साजरा केला जातो.

सदर परंपरेतून आणि भक्तीमधून कै. लहानू भिकू भगत (तेली) यांनी स्वतःच्या जमीनी विकून १९१३ साली घरातील देवघराला मंदिराचे स्वरूप दिले. सदर मंदिर देव्हारा महाराष्ट्रात प्रसिद्ध असून सर्व तुळजाभवानी भक्त आणि संपूर्ण तेली समाजाची आस्था याठिकाणी असून महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवनीचे माहेर अशी ओळख म्हणून नावारूपास आलेले हे मंदिर देव्हारा ऐतिहासिक महत्व असलेले आहे.

यामुळे आकसापोटी व जातीय द्वेषातून गावातील गुन्हेगार पार्श्वभूमी असलेला आमदार शिवाजी कर्डीले हा तुळजाभवानीचे मंदिर आणि स्थावर मिळकत बळकविण्याच्या गैरहेतून प्रेरित होऊन गेल्या अनेक वर्षापासून पुजारी भगत कुटुंबीयास वेगवेगळ्या मार्गाने सत्तेचा, प्रशासनाचा, पदाचा व गुंडीरीचा वापर करुन पुजारी भगत कुटुंबीयावर खोट्या केसेस करणे, घरावर चालून जाणे, शिवीगाळ करणे, हातपाय तोडणे, म ारून टाकण्याची दमदाटी करणे, मंदिराविरुद्ध सत्तेचा गैरवापर करुन चुकीचे आणि लबाडीचे आदेश पारीत करून घेणे, बदनामी करणे, मंदीर व परिसराच्या विकासाच्या विरोधात कारस्थाने करणे, इतर मिळकतींमध्ये त्रास देणे इ. अनेक प्रकारे तिराईत इसमांना उभे करून मंदिरास व विविध विकासास त्रास देत आहे याबाबत अनेक तक्रारी पोलीस, महसूल, विधी व न्याय आणि इतर संबंधित शासकीय विभागास वेळोवेळी देवून देखील कुठलीही कारवाई होत नाही. याउलट आमदार शिवाजी कर्डीले वर अनेक खून, खंडणी, दंगल घडविणे, पोलीस अधीक्षक कार्यालय तोडफोड असे अनेक

गंभीर गुन्हे दाखल असतानाही व तसेच भ्रष्टाचार, जमिनी बळकावणे, रस्ते अडवून अतिक्रमण करणे




बेकायदेशीर बांधकामे

इ. अनेक आरोप असतानाही कुठलीही कारवाई केली जात नाही. त्याच्या राजकीय पदाचा व सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी

धरून व संबंधाचा गैर वापर करून आम्हा पुजारी भगत कुटुंबास खूप त्रास देत आहे.

नुकतेच दि. २०/०२/२०२५ रोजी स्थानिक प्रशासनास हाताशी धरून अधिकृत कायदेशीर बांधकाम असतानाही अनधिकृत बांधकाम असल्याचा बागलबुवा करून मंदीराच्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रम ासाठी स्वतःच्या मालकीच्या जागेत उभारण्यात आलेले सांस्कृतिक भवन उध्वस्त केले इतकयावरच न थांबता श्री देवी मंदिराचे प्रवेशद्वारही पाडले. देवीची नुकतेच दि. २०/०२/२०२५ रोजी स्थानिक प्रशासनास हाताशी धरून अधिकृत कायदेशीर बांधकाम असतानाही अनधिकृत बांधकाम असल्याचा बागलबूया करून मंदीराच्या धार्मिक व सामाजिक कार्यक्रम ासाठी स्वतःच्या मालकीच्या जागेत उभारण्यात आलेले सांस्कृतिक भवन उध्वस्त केले इतक्यावरच न थांबता श्री देवी मंदिराचे प्रवेशदारही पाडले. देवीची पालखी व पूजा सामग्री इ. यांची तोडफोड करून विटंबना केली त्यामुळे आमच्या धार्मिक भावना दुः खावल्या गेल्या असून त्यामुळे आम्ही श्री देवीचे पुजारी भगत कुटुंबीय अत्यंत भयभीत होवून त्रासलेले आहोत. याबाबत योग्य त्या तकारी देखील दिलेल्या आहेत. परंतु राजकीय वरदहस्तामुळे कुठलीही कडक कारवाई केली जात नाही. सदर निवेदनानुसार संबंधित लोकांवर कारवाई लवकरात लवकर केली नाही तर राज्यभर आंदोलने करण्यात येतील असे दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे यावेळी तेली समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.